Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/भांडार /उत्तरपत्रिका वितरण/464 दिनांक :- 30 JAN 2026

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

प्रति,
सर्व केंद्रसंचालक / संबंधित परीक्षा केंद्राचे मुख्याध्यापक,
माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२६
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :-** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२६ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स व स्टेशनरी साहित्य हस्तपोच पुरवठा करणेबाबत

**संदर्भ :-** क्र.कोविमं/भांडार /उत्तरपत्रिका वितरण/४१२ दि.२९.०१.२०२६ संकेतस्थळावर अपलोड पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये आपणास पाठविण्यात येणाऱ्या फेब्रु-मार्च २०२६ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशा, होलोक्राफ्ट स्टीकर्स व इ. स्टेशनरी साहित्य वाटपामध्ये अशंत: बदल करण्यात येत असून खालील तपशीलाप्रमाणे सुधारित दिनांकानुसार वाटप होणार आहे यांची नोंद घ्यावी. तरी आपल्या केंद्रावर सकाळी ८.०० वाजल्यापासून मंडळाचा प्रतिनिधी येईपर्यत आपण अथवा आपला प्रतिनिधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहील असे नियोजन करावे. सद्यस्थितीत केंद्रसंचालक नियुक्तीबाबत या कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू असून परीक्षा केंद्रावर उपरोक्त नमुद साहित्य मंडळ प्रतिनिधी घेऊन आल्यास सदरचे साहित्य आपण स्विकारून मंडळ प्रतिनिधींना पोहोच द्यावी. व ज्यावेळी केंद्रसंचालक यांची नियुक्त होईल त्यावेळी सदरचे साहित्य रितसर केंद्रसंचालक यांच्याकडे देऊन पोहोच आपल्याकडे ठेवावी व एक प्रत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

**कोणत्याही परिस्थितीत परीक्षेसाठी आवश्यक लागणारे साहित्य केंद्रावर उतरून घ्यावे. जे परीक्षा केंद्र/शाळा/क.महाविद्यालय सदरचे साहित्य उतरून घेण्यास नकार देतील त्यांच्यावर मंडळ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

सर्व साहित्य प्राप्त होताच मोजून ताब्यात घ्यावे व पुरेसे असल्याची खात्री करावी. परीक्षेचे साहित्य कमी असल्यास तात्काळ भांडार शाखेशी संपर्क साधून ते उपलब्ध करून घेण्याची खबरदारी घ्यावी.

| अ.क्र. | रुट नंबर | रूटमार्ग तपशील | रुटचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ०१ | बहादूरवाडी ते कोयनानगर | सोमवार ०२/०२/२०२६ |
| २ | ०४ | मेढा ते अंधारी-कास | सोमवार ०२/०२/२०२६ |
| ३ | ११ | हमिदवाडा (कारखाना) ते चंदगड | सोमवार ०२/०२/२०२६ |
| ४ | ०६ | सांगली ते बिळूर | गुरुवार ०५/०२/२०२६ |
| ५ | ०८ | शिरोली (पु.) ते आरळा | गुरुवार ०५/०२/२०२६ |
| ६ | ०९ | वडणगे निगवे ते धामोड | गुरुवार ०५/०२/२०२६ |
| ७ | ०२ | येळगांव ते अपशिंगे | सोमवार ०९/०२/२०२६ |
| ८ | ०३ | पेठवडगांव ते झरे | सोमवार ०९/०२/२०२६ |
| ९ | १२ | कणेरी ते आजरा | सोमवार ०९/०२/२०२६ |
| १० | ०५ | लोणंद ते देवापूर | गुरुवार १२/०२/२०२६ |
| ११ | ०७ | कसबे डिग्रज ते संख | गुरुवार १२/०२/२०२६ |
| १२ | १० | गांधीनगर ते हालोंडी | गुरुवार १२/०२/२०२६ |
| १३ | १३ | कोल्हापूर स्थानिक | शनिवार १४/०२/२०२६ |

**उपरोक्त प्रमाणे परीक्षा विषयक साहित्य परीक्षा केंद्रावर उतरवून घेणे अनिवार्य आहे. तसेच जे परीक्षा केंद्र/ माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय सदरचे साहित्य उतरुन घेण्यास नकार देतील त्यांच्यावर मंडळ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. तसेच सर्व साहित्य प्राप्त होताच मोजून ताब्यात घ्यावे व पुरेसे असल्याची खात्री करावी. परीक्षेचे साहित्य कमी असल्यास तात्काळ भांडार शाखेशी संपर्क साधून ते उपलब्ध करून घेण्याची दक्षता घ्यावी.**

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर